**महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहीम प्रसिध्दीसाठी वृत्तपत्राच्या बातमीदारांना पुरस्कार देण्यासाठी उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्याकरिता समिती गठीत करण्याबाबतचे शासन निर्णय रद्द करणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः तंमुगा-११२५/प्र.क्र.१७३/पोल-१५**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगूरू चौक, मुंबई ४००००३
दि.१९/०५ /२०२६

<u>वाचा :-</u>

१) गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय, क्र. तंमुगा -१००८/प्र.क्र.१९/पोल-१५ एमआयएस- दिनांक ११ एप्रिल, २००८.

<u>प्रस्तावना:-</u>

संदर्भीय शासन निर्णय दिनांक ११ एप्रिल २००८ नूसार महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम प्रभावी व यशस्वीरित्या राबविण्यामध्ये पूरक व प्रबोधनात्मक बातम्यांच्या माध्यमातून मोहिमेला वस्तुनिष्ठ प्रसिध्दी देणा-या वृत्तपत्रांच्या बातमीदारांना जिल्हास्तर, विभागीयस्तर व राज्यस्तरावर पुरस्कारासाठी उमेदवारांची गुणवत्तेनूसार निवड करण्याकरिता समिती गठीत करण्याबाबत मार्गदर्शन सूचना निर्गमित करून समितीची रचना व स्वरूप निश्चित करण्यात आलेली आहे.

तथापी सद्यस्थितीत तंटामुक्त गांव मोहिमेच्या अनुषंगाने ज्या मूळ प्रयोजनासाठी सदर समिती स्थापन केलेली होती ती तंटामुक्ती मोहीम कालबाह्य झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.तसेच मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील दि. ०३ व ०४ एप्रिल २०२५ रोजी पुणे येथे संपन्न झालेल्या महसूल परिषदेमध्ये मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्य शासनाच्या धोरणात्मक योजनांमध्ये प्रत्यक्ष अनुभव व प्रतिक्रिया समाविष्ट करून कार्यक्षम, परिणामकारक आणि लोकाभिमुख प्रशासन निर्माण करण्याच्या दृष्टीने दि. ०९ एप्रिल, २०२५ रोजी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. सदर अभ्यास समितीने माहात्मा गांधी तंटामुक्त गाव योजनेला वस्तुनिष्ठ प्रसिध्दी देण्याच्या वृत्तपत्रांच्या बातमीदारांना जिल्हास्तरावर पुरस्कारासाठी उमेदवारांची गुणवत्तेवर निवड करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली जिल्हा स्तरावरील समिती रदद करण्याची शिफारस केलेली आहे.तंटामुक्त गाव मोहीमेच्या अनुषंगाने गठीत समितीचे प्रासंगिकत्व व आवश्यकता कालवाह्य झाल्यामूळे सदर समिती रद्द करण्याची शिफारस विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेली असल्याने महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम प्रसिध्दीसाठी वृत्तपत्राच्या बातमीदारांना पुरस्कार देण्याबाबत गठित करण्यात आलेली जिल्हास्तरीय समिती रदद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

सबब गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचे महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम प्रसिध्दीसाठी वृत्तपत्राच्या बातमीदारांना पुरस्कार देण्यासाठी उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्याकरिता समिती गठीत करण्याबाबतचे शासन निर्णय क्र. तंमुगा-१००८/प्र.क्र.१९/पोल १५ दिनांक ११ एप्रिल २००८ रद्द करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१९१२४२५०७४२९ असा आहे. हे शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YAMUNA DHANANJAY JADHAV

Digitally signed by YAMUNA DHANANJAY JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=2C3DF382DDA9F94D60DC0EA9D4827D801C6EDC144E58FFD58ED3EF2FE7FB16A5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F6CCE4E8E68DFB65BCD1BA4CE35CF82E2B05A7DDC3056B9285E5C75F146B1EEA, cn=YAMUNA DHANANJAY JADHAV
Date: 2026.05.19 12:43:45 +05'30'

**( यमुना जाधव )**
**उप सचिव, गृह विभाग,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रतिलिपी,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
५. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
७. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
८. सर्व प्रशासकीय विभागांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. सर्व विभागीय आयुक्त
११. सर्व परिक्षेत्रांचे विशेष पोलीस महानिरीक्षक
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी
१४. सर्व पोलीस अधीक्षक
१५. सर्व उपविभागीय अधिकारी (जिल्हाधिकारी यांचे मार्फत)
१६. सर्व उपविभागीय (पोलिस अधिकारी पोलीस अधीक्षक यांचे मार्फत)
१७. सर्व गटविकास अधिकारी
१८. सर्व तहसीलदार
१९. सर्व पोलीस ठाणे प्रभारी
२०. निवड नस्ती, पोल १५